# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापुर धरणाजवळ, नाशिक 422 222

## आरोग्य विज्ञान विद्याशाखा

# इतिवृत्त

गुरूवार दिनांक 17/10/2019 रोजी सकाळी 11.00 वाजता आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेची बैठक आरोग्य विज्ञान विद्याशाखा सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती.

**सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.**

01. डॉ. जयदिप निकम (संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा)
02. डॉ .कविता साळुंके, सहयोगी प्राध्यापक ,शिक्षणशास्त्र विद्याशाखा
03. डॉ. हेमंत राजगुरू, सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
04. श्री. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
05. डॉ. लतिका अजबाणी, सहायक प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
06. डॉ. अभय पाटील, सहायक प्राध्यापक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा
07. डॉ. सुनील काशीनाथ महाजन, HOD, पंचवटी फार्मासी कॉलेज, नाशिक.
08. डॉ. चित्रा नेतारे, कन्सल्टींग, पॅथार्लेजिस्ट, नविमुंबई.
09. डॉ. मिनाक्षी गवळी, के.एस.के.डब्लु. कॉलेज, सिडको नाशिक.

**सदर बैठकीस खालील सदस्य त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव अनुपस्थित होते.**

01. डॉ. राजकुमार मुरलीधर तिवटने, ऑल इंडिया इन्स्टियुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट, पुणे.
02. डॉ. दत्ता गायकवाड, बी. व्ही. जी. पुणे.

**विषय पत्रिका**

या बैठकीमध्ये पुढील विषयांवर चर्चा करून ठराव / शिफारशी करण्यात येणार आहेत त्या पुढीलप्रमाणे:

**विषय क्रमांक बी-01/2019/01**: दिनांक 02 एप्रिल 2018 रोजी : झालेल्या आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे....

सहपत्र क्र.01

**ठराव :** दिनांक 02 एप्रिल 2018 रोजी झालेल्या आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त आणि त्यावर केलेले कार्यवृत्त याला मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक बी-01/2019/02 : आरोग्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत "नुत्य योग शास्त्र" (एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम) नविन शिक्षणक्रमास कार्योत्तर मान्यतेस्तव सविनय सादर.**

Scanned with CamScanner

(टिप्पणी : आरोग्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत शैक्षणिक वर्ष सन 2019-2020 पासून नव्याने नुत्य योग शास्त्र हा शिक्षणक्रम कार्यन्वीत करण्यात आलेला आहे.

**(नुत्य योग शास्त्र)**

नुत्य कला व योग क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी केलेल्या मागणीनुसार वरील नविन शिक्षणक्रमास मान्यता मिळाल्यास सदर विद्यार्थ्यांना ही पदविका पूर्ण केल्यास नुत्य व योग शास्त्राचे शास्त्रशुध्द ज्ञान घेण्यासाठी उपयोग होऊ शकतो. तसेच शारीरीक व मानसिक स्वास्थ्ये प्राप्त करून सर्वांगीन व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी, विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नविन संधी उपलब्ध होतील. या शिक्षणक्रमामुळे विद्यार्थी संख्या सुध्दा वाढणार आहे. तरी नविन शिक्षणक्रमास मान्यता मिळाल्यास पुढे सुरू ठेवण्यासाठी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेला करण्यात येत आहे.)

सहपत्र क्र. 02

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत शैक्षणिक वर्ष सन 2019-2020 पासून नव्याने "नुत्य योग शास्त्र" हा शिक्षणक्रम नियमीत राबविण्यास विद्याशाखा परिषदेकडून मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक बी-01/2019/03 : DOTA (P40) या शिक्षणक्रमाचा सन 2019-2020 या शैक्षणिक वर्षापासुन मूल्यमापन (पॅटर्न बदल करणेबाबत.)**

(टिप्पणी : आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या DOTA (P40) (दोन वर्ष कालावधीचा) शिक्षणक्रमाच्या सध्याच्या मूल्यमापन (पॅटर्नमध्ये) सुधारणा करून नविन पॅटर्न 80-20 (40 गुणास उत्तीर्णता) पध्दत स्विकारण्याबाबतची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेला करण्यात येत आहे.)

सहपत्र क्र. 03

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या DOTA (P40) विद्यार्थांच हीत पाहता या शिक्षणक्रमाच्या सध्याच्या मूल्यमापन (पॅटर्नमध्ये) सुधारणा करून नविन पॅटर्न 80-20 (40 गुणास उत्तीर्णता) पध्दत राबविण्यास विद्याशाखा परिषदेकडून मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक बी-01/2019/04 : P.G.D.H.H.C.M. (P42) या शिक्षणक्रमाचा सन 2019-2020 या शैक्षणिक वर्षापासुन मूल्यमापन (पॅटर्न बदल करणेबाबत.)**

(टिप्पणी : आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या व P.G.D.H.H.C.M. (P42). (दोन वर्ष कालावधीचा) शिक्षणक्रमाच्या सध्याच्या मूल्यमापन (पॅटर्नमध्ये) सुधारणा करून नविन पॅटर्न 80-20 (40 गुणास उत्तीर्णता ) पध्दत स्विकारण्याबाबतची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेला करण्यात येत आहे.)

सहपत्र क्र. 04

**ठराव :** वरील ठरावानुसार आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या व P.G.D.H.H.C.M. (P42) विद्यार्थांच हीत पाहता या शिक्षणक्रमाच्या सध्याच्या मूल्यमापन (पॅटर्नमध्ये) सुधारणा करून नविन पॅटर्न 80-20 (40 गुणास उत्तीर्णता) पध्दत राबविण्यास विद्याशाखा परिषदेकडून मान्यता देण्यात आली.

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक बी-01/2019/05 : B.A./ B.sc./ M.A. योग व नॅचरोपॅथी शिक्षणक्रमाचे नाव B.A./ B.sc./ M.A. "योग शास्त्र" असे बदल करण्यास मान्यता घेणे.**

(टिप्पणी : आरोग्य विज्ञान विद्याशाखामार्फत प्रस्तावित असलेले शिक्षणक्रम B.A./ B.sc./ M.A. योग व नॅचरोपॅथी ऐवजी (B.A./ B.sc./ M.A. "योग शास्त्र") असा बदल करण्याबाबतची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेला करण्यात येत आहे.)

सहपत्र क्र. 05

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखामार्फत प्रस्तावित असलेले शिक्षणक्रम B.A./ B.sc./ M.A. योग व नॅचरोपॅथी ऐवजी (B.A./ B.sc./ M.A. "योग शास्त्र") UGC च्या नियमानुसार असल्यास किंवा UGC च्या नियमानुसार नावात बदल करण्यास विद्याशाखा परिषदेकडून मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक बी-01/2019/06 : T.Y. B.sc. (LT) व T.Y. B.A. योग शास्त्र. शिक्षणक्रमाचे लेखक व संपादनाचे मानधन अदा करणेस मान्यता घेणे.**

(टिप्पणी : आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या : T.Y. B.Sc. (LT) व T.Y. B.A. योग शास्त्र शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य लेखन व संपादन म्हणून काम पाहीलेल्या लेखकांना (लेखक/संपादकांचे) मानधन अदा करण्यास आरोग्य विज्ञान विद्याशाखेकडून विद्याशाखा परिषदेला करण्यात येत आहे.)

सहपत्र क्र. 06

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या : T.Y. B.Sc. (LT) व T.Y. B.A. योग शास्त्र शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य लेखन व संपादन म्हणून काम पाहीलेल्या लेखकांना (लेखक/संपादकांचे) मानधन विद्यापीठ नियमानुसार अदा करण्यास विद्याशाखा परिषदेकडून मान्यता देण्यात आली.

संचालक तथा अध्यक्ष
आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषद

O/C

Scanned with CamScanner